# प्रकरण पाचवे

## उपसंहार

# प्रकरण पाचवे

## उपसंहार

कथालेखक बाबुराव बागूल हे मराठीतील व दलित साहित्यातील एक अग्रणी कथालेखक आहेत. दलित कथालेखक म्हणून त्यांच्या कथालेखनाची कोणती वैशिष्टये आढळतात याचा शोध घेणे हा प्रस्तुत उद्देश ठेवून आपण अभ्यासास प्रवृत्त झालो. दलित लेखक म्हणून बाबुराव बागुलांच्या साहित्याचा अभ्यास करण्याआधी, दलित साहित्याचा अभ्यास करण्याआधी दलित साहित्य-विषयक प्रमुख भूमिका कोणत्या व बाबुराव बागूल यांची काही भूमिका आहे काय, ती पाहणे आवश्यक वाटल्यावरुन पहिल्या प्रकरणामध्ये त्यादृष्टीने विवेचन केले आहे. दलित साहित्याबद्दल घेण्यात येणारी एक भूमिका नकार विद्रोह यांना प्राधान्य देणारी जन्मजात अस्पृश्यतेला महत्त्व देणारी आहे; तर दुसरी आर्थिक शोषणाला महत्त्व देणारी आहे. ह्या द्विविध भूमिकांचा परामर्ष विविध विचारवंताच्या भूमिकांच्या अनुरोधाने घेतल्यानंतर बाबुराव बागूल यांच्या भूमिकेचे स्वरुप ध्यानात घेतले. बागूल हे जन्मजात अस्पृश्यतेमुळे प्राप्त होणाऱ्या दलितत्वाच्या जोडीनेच आर्थिक शोषणामुळे निर्माण होणाऱ्या दलितत्वाचाही विचार करतात. त्यांची भूमिका या दोहोंचा समन्वय करणारी व्यापक मानवतावादी भूमिका आहे असे ध्यानात येते.

दुसऱ्या प्रकरणामध्ये ग्रामीण जीवनाचे चित्रण करणाऱ्या ज्या कथा बाबुराव बागूल यांनी लिहिलेल्या आहेत त्यांचे विवेचन केले आहे. प्राधान्याने जन्मजात अस्पृश्यतेमुळे दलितांना कोणत्या प्रकारचे दुःख सहन करावे लागते याचे चित्रण, ग्रामीण समाजरचनेचे व ग्रामीण मानसिकतेचे यथायोग्य आकलन करुन बागूल आपल्या कथांमध्ये करतात.

तिसऱ्या प्रकरणात बागुलांनी सुसंस्कृत शहराने बाहेर लोटलेल्या व झोपडपट्टीतील भयानक दारिद्र्ययुक्त जीवन जगणाऱ्या स्त्रीपुरुषाचे चित्रण

करणा-या ज्या कथा लिहील्या आहेत, त्यांचे विवेचन केले आहे· जन्मजात अस्पृश्यतेच्या पलीकडचा परंतु दलितातच ज्याचा समावेश होऊ शकेल अशा ह्या वर्गाचे चित्रण बागूलांनी या कथामध्ये केले आहे· विविध भाषा, धर्म, जाती, प्रदेश, यांतील हे लोक असून एक प्रकारचे दलितत्त्व वाट्याला आलेल्या या लोकांचे दु:खमय, यातनामय जीवन बागूल समर्थपणे चित्रित करतात.

बागूल हे दलितत्त्वाची कक्षा याहूनही रुंदावतात, हे त्यांच्या सूड या दीर्घ कथेमध्ये दिसून येते· स्त्री म्हणून वाट्याला येणा-या दु:खाचे चित्रण बागुलांनी या कथेत केलेले आहे· दलित लेखक म्हणून बागूल हे दलित-पणाच्या सामाजिक मर्यादेत अथवा आर्थिक शोषणाच्या विचाराच्या मर्यादेत कुंठित झालेले नाहीत· दलितपण सामावून घेऊन ते लेखक म्हणून विश्वात्मक पातळीवर जातात याचा प्रत्यय यांची सूड ही दीर्घकथा देते· लेखक म्हणून कथात्मक साहित्याला स्वाभाविकपणेच वरच्या दर्जाची गुणवत्ता प्राप्त झाली आहे असा निष्कर्ष अखेरीस काढावा लागतो·

## संदर्भ
## अ
## ग्रंथसूची


| | |
|---|---|
| १· अनवलीकर सुधाकर | परिसंवादवृत्त, दलित साहित्य : स्वरूप आणि प्रेरणा, इनामदारबंधू प्रकाशन, पुणे, १९७० वरून ,उद्धृत |
| २· कवठेकर बाळकृष्ण | दलित साहित्य : एक आकलन, अजब पुस्तकालय, कोल्हापूर, जाने १९८१· |
| ३· चिटणीस म·भि· | दलित साहित्य : एक अभ्यास, संपा· अर्जुन डांगळे, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, १९७८ |
| ४· जाधव रा·ग· | निळी पहाट, प्राज्ञपाठशाला मंडळ, वाई १९७८ |
| ५· ——— | साहित्य आणि सामाजिक संदर्भ, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे १९७५ |
| ६· जोशी लक्ष्मण शास्त्री | दोन शब्द दलित साहित्य : एक अभ्यास संपा· अर्जुन डांगळे, महाराष्ट्र राज्य साहित्य-संस्कृती मंडळ, मुंबई, १९७८ |
| ७· पवार दया | परंपरा नाकारणाऱ्या वृत्तीतूनच उद्याचे धगधगते वाङ्मय निर्माण होईल, पूर्वोक्त |
| ८· पै शिरीष | प्रस्ता· जेव्हा मी जात चोरली होती, अभिनव प्रकाशन, मुंबई, १९७६ |

| | |
|---|---|
| ९· फडके भालचंद्र | दलित साहित्य : वेदना व विद्रोह, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, १९७७· |
| १०· बाबुराव बागूल | जेव्हा मी जात चोरली होती, २ री आ·, अभिनव प्रकाशन, मुंबई १९७६ |
| ११· ———— | मरण स्वस्त होत आहे, १ ली आ·, बा·ल· पाठक प्रकाशन, मुंबई, १९६९· |
| १२· ———— | मरण स्वस्त होत आहे, २ री आ·, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, १९८० |
| १३· ———— | सूड लोकवाङ्·मय प्रकाशन २ री आ·, मुंबई, १९८१ |
| १४· ~~दी~~ ———— | दलित साहित्य : आमचे क्रांतीविज्ञान, बुध्दिस्ट पब्लिसिंग हाऊस, नागपूर, १९८१ |
| १५· शेवडे इंदूमती | मराठी कथा : उगम आणि विकास, सोमैय्या पब्लिकेशान्स, मुंबई, १९७३ |
| १६· सारडा शंकर | काही पुस्तके : काही लेखक, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९६५ |
| १७· सोनवणे विजय | दलित साहित्य का नको ? महाराष्ट्र बौध्द साहित्य परिषद, मुंबई, १९७९ |

# संदर्भ

## ब

## नियतकालिक सूची

| | | |
|---|---|---|
| १. | अस्मितादर्श | दिवाळी अंक १९७० |
| २. | ———— | दिवाळी अंक १९८२ |
| ३. | ———— | ॲनोडी १९७५ |
| ४. | ———— | दिवाळी अंक १९७६ |
| ५. | ———— | मे/जू १९७७ |
| ६. | आम्ही | दिवाळी अंक १९७३ |
| ७. | सकाळ | १ आँगस्ट १९८१ |
| ८. | समाज प्रबोधन पत्रिका | जाने./फेब्रु. १९७० |
| ९. | ———— | नो/डि १९७० |
| १०. | सत्यकथा | जूलै १९७० |
| ११. | ———— | मे १९८१ |

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR